**ठळक बातम्या**

- संविधान सभेत झालेल्या चर्चा, हा गौरवशाली वारसा असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं प्रधानमंत्र्यांचं ‘मन की बात’ मधून आवाहन
- रेल्वे सुरक्षा दलानं गेल्या चार वर्षांमध्ये ५८६ बांगलादेशी नागरिक आणि ३१८ रोहिंग्यांना पकडल्याची रेल्वे मंत्रालयाची माहिती
- इस्रायल आणि हमास यांच्यात सहा आठवड्यांचा युद्धविराम

  **आणि**
- पहिल्यावहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघ विजयी

**<><><><><>**

संविधान सभेत झालेल्या चर्चा, सदस्यांनी मांडलेले विचार, हा आपला सर्वात मोठा वारसा असून संविधान निर्मात्यांना अभिमान वाटावा, असा भारत घडवण्यासाठी कार्यरत राहिलं पाहिजे, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ‘मन की बात’ कार्यक्रमातून केलं.

ते म्हणाले.......

**होल्ड - बाईट - मन की बात**

भारताच्या प्रजासत्ताकाचा ७५ वा वर्धापन दिन, तसंच भारतीय संविधान लागू झाल्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमीत्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी संविधान सभेत मांडलेल्या विचारांचं ध्वनिमुद्रण प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांना ऐकवलं. येत्या २५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार

दिन असल्याचं सांगून ते म्हणाले की, संविधानाने निवडणूक आयोगाला खूप महत्त्वाचं स्थान दिलं आहे, आणि गेल्या दशकभरात देशाची लोकशाही अधिक मजबूत आणि समृद्ध झाली आहे. निवडणूक आयोगानं तंत्रज्ञानाचा वापर करत, लोकशाहीला बळ दिलं आहे, असं म्हणत नागरिकांनी वेळोवेळी आपला मताधिकार बजावत लोकशाही प्रक्रियेचा भाग व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं.

भारतानं अंतराळ क्षेत्रात केलेल्या ऐतिहासिक कामगिरीविषयी त्यांनी श्रोत्यांना महिती दिली. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं अंतराळात दोन उपग्रहांना परस्परांशी जोडण्याचा प्रयोग नुकताच यशस्वी करून दाखवल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. भारतीय अंतराळ तंत्रज्ञान स्टार्ट-अप कंपनीनं देशातला पहिला खाजगी उपग्रह यशस्वीरित्या प्रक्षेपित केल्याची माहिती त्यांनी दिली.

काही दिवसांपूर्वीच स्टार्टअप इंडिया योजनेला ९ वर्ष पूर्ण झाल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी करून दिलं. या काळात देशात निर्माण झालेले अर्ध्यापेक्षा जास्त स्टार्टअप्स टियर २ आणि टियर ३ शहरांमधले आहेत,असं सांगून ते म्हणाले, यातून आपली स्टार्टअप संस्कृती केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित राहिलेली नाही हेच दिसून येतं. याबाबात त्यांनी वाशीमसह देशातल्या इतर काही शहरांचं उदाहरण दिलं. छोट्या शहरांमधले अर्ध्यापेक्षा जास्त स्टार्टअप्स मुली चालवतात, असंही त्यांनी कौतुकानं सांगितलं.

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरू असलेला महाकुंभमेळा म्हणजे एकतेचं दर्शन घडवणारा महाकुंभ आहे, असं ते म्हणाले. यंदाच्या कुंभमेळ्यात युवा वर्गाचा मोठा सहभाग असल्याचा उल्लेख करुन त्यांनी समाधान व्यक्त केलं. देशाच्या विविध भागातले उत्सव- परंपरा आणि कुंभमेळा यांचा संबंध त्यांनी स्पष्ट केला. हा

कुंभमेळा डिजीटल माध्यमांतून जागतिक स्तरावर लोकप्रिय ठरत असून त्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे, असं ते म्हणाले.

येत्या २३ जानेवारीला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीदिनी आपण पराक्रम दिवस साजरा करणार असल्याची आठवण त्यांनी श्रोत्यांना करुन दिली. सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याला उजाळा देतानाच बोस यांच्या घराला भेट दिल्याचा अनुभव त्यांनी श्रोत्यांना ऐकवला. देशात वन्यजीवांच्या संवर्धन आणि सहकार्यासाठी होत असलेल्या, तसंच महिला बचत गटांच्या प्रेरणादायी यशोगाथाही प्रधानंत्र्यांनी आजच्या 'मन की बात' मधून श्रोत्यांना ऐकवल्या.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एनडीआरएफ अर्थात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या स्थापना दिनी या दलातल्या शूर जवानांच्या कामगिरीला सलाम केला आहे. प्रधानमंत्र्यांनी या जवानांच्या धैर्य, समर्पण आणि निस्वार्थ सेवेचं समाज मध्यमावरच्या संदेशाद्वारे कौतुक केलं आहे. आपत्ती काळात सुरक्षेची खात्री करणं, लोकांचे जीव वाचवणं यासाठी या दलाची अतूट वचनबद्धता प्रशंसनीय आहे, असंही ते म्हणाले. आपत्ती प्रतिसाद आणि व्यवस्थापनात एनडीआरएफ नं जागतिक मानक स्थापन केल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेनं सदस्यांची प्रोफाईल अपडेट करण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुलभ केली आहे. ज्या सदस्यांचे युनिव्हर्सल अकाऊंट नंबर आधारकार्डच्या माध्यमातून वैध झाले आहेत, असे सदस्य त्यांच्या प्रा ेफाईलमध्ये त्यांचं स्वतःचं नाव, जन्मतारीख, लिंग, राष्ट्रीयत्व, वडिल अथवा

आईचं नाव, रुजू झाल्याचा दिनांक, समाप्ती दिनांक आदी तपशील कुठल्याही कागदपत्रांशिवाय अपलोड करू शकतात.

या सुविधेचा लाभ ३ लाख ९० हजार कर्मचारी भविष्य निर्वाह निधी धारकांना होणार असल्याची माहिती श्रम आणि रोजगार मंत्रालयानं दिली आहे.

**<><><><><>**

दिल्ली सरकारच्या कर्मचाऱ्यांकरता निवृत्तीनंतर घरं बांधण्यासाठी केंद्र सरकारनं सवलतीच्या दरात जमीन उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आम आदमी पार्टीचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी केली आहे. ते आज दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलत होते. जमिनीची मागणी करणारं पत्र आपण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पाठवल्याचंही त्यांनी सांगितलं. अशी जागा उपलब्ध झाली तर दिल्ली सरकार आपल्या कर्मचाऱ्यांसाठी घरं बंधू शकेल. सर्वप्रथम सरकारी स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी जमीन उपलब्ध करून द्यावी, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

जागतिक आर्थिक मंच परिषदेत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज स्वित्झर्लंडमधल्या झ्युरिच इथं पोहचले. स्थानिक मराठी मंडळींनी लेझीम खेळत मुख्यमंत्र्यांचं पारंपरिक पद्धतीनं स्वागत केलं. यावेळी फडणवीस यांनी मराठी भाषिकांशी संवाद साधला.

**<><><><><>**

रेल्वे सुरक्षा दलानं गेल्या चार वर्षांमध्ये ५८६ बांगलादेशी नागरिक आणि ३१८ रोहिंग्यांना पकडलं आहे. आसाममधून भारतात बेकायदा पद्धतीनं येणारे बहुतांश लोक रेल्वेने देशाच्या इतर भागात जातात. हे थांबवण्यासाठी सीमासुरक्षा

दल, स्थानिक पोलीस आणि गुप्तचर पथकांच्या मदतीनं रेल्वे सुरक्षा दल प्रयत्न करत असल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली आहे.

**<><><><><>**

इस्त्रायल आणि हमास यांच्यातल्या सहा आठवड्यांचा युद्धविराम आज तीन तासांच्या विलंबानं सुरू झाला. सध्या सुरु असलेला संघर्ष निवळण्याच्या दृष्टीनं हे महत्त्वपूर्ण पाऊल असून युद्धविरामाची सुरूवात झाल्याच्या वृत्ताला आज मध्यस्थ देश कतारनं पुष्टी दिली आणि सुरुवातीला सुटका होणाऱ्या तीन बंदिवानांपैकी काहीजण परदेशी नागरिक असल्याचं सांगितलं.

सुटका होणाऱ्या ओलिसांची यादी मिळाली असून यासंबंधीच्या तपशीलांची तपासणी सुरक्षायंत्रणा करत आहेत असं इस्त्रायलचे प्रधानमंत्री नेत्यान्याहू यांनी समाजमाध्यमावर सांगितलं आहे. येत्या सात दिवसांत आणखी चार महिला बंदिवानांची सुटका होऊ शकते असं इस्त्रायलच्या प्रधानमंत्री कार्यालयानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या करारानुसार दोन्ही बाजूंनी बंदिवानांचं प्रत्यर्पण होणार आहे.

दरम्यान, युद्धविराम हा टप्प्याटप्प्याने होणाऱ्या कराराचा पहिला टप्पा असून, आमच्या बंदिवानांना परत आणण्याची आणि ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासनं केलेल्या हत्याकांडाची पुनरावृत्ती होऊ नये याची निश्चिती करण्याची क्षमता या करारामधे आहे, असं इस्त्रायलचे भारतातील राजदूत रियुवेन अजर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारताच्या महिला संघानं पहिल्यावहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत नेपाळच्या संघावर ७८-४० अशी मोठ्या फरकानं मात करून विजेतेपदावर नाव

कोरलं आहे. नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी इनडोर स्टेडियमवर नुकत्याच झालेल्या सामन्यात भारतानं पहिल्यापासूनच निर्विवाद वर्चस्व गाजवलं आणि नेपाळला रोखून धरलं. भारताच्या पुरुष संघाचा सामना आज रात्री नेपाळविरुद्ध होणार आहे.

**<><><><><>**

डेन्मार्कच्या व्हिक्टर ॲक्सेलसेन यानं नवी दिल्लीत झालेल्या इंडियन ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीचं जेतेपद पटकावलं आहे. आज झालेल्या अंतिम सामन्यात त्यानं हाँगकाँगच्या सी यू ली याच्यावर २१-१६, २१-८ अशी थेट गेम्समध्ये मात केली. महिला एकेरीत दक्षिण कोरियाची ॲन से यंग अजिंक्य ठरली. तिनं थायलंडच्या पी. चोचुवाँगला २१-१२, २१-९ असं पराभूत केलं.

**<><><><><>**

बॉलीवुड अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला प्रकरणी मुख्य संशयिताला मुंबई पोलिसांनी ठाण्यातून अटक केली असून त्याला न्यायालयानं ५ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. त्याचं नाव मोहम्मद शरीफ इस्लाम शहजाद असं असून तो मूळचा बांग्लादेशी असल्याचा संशय आहे. त्याने आधी आपलं नाव विजय दास असं सांगितलं होतं, पण पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर त्याचं खरं नाव समोर आलं.